कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१२ ( ) उच्च् शिक्षणात दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा देण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पुढाकार घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ व मुंबई येथील टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस यांच्यात शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने दिव्यांग विद्यार्थ्यांना कॉमन रुम, उपहारगृह, सभागृह, रॅम्प्, ग्रंथालय, पुस्तके, शौचालय आदी सोयी-सुविधा देण्याबाबत दिव्यांग व्यक्तिंचे अधिकार, कायदा-२०१६ ची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. विद्यापीठाने याबाबत यापूर्वीच पुढाकार घेऊन कॅम्प्सवर सोयी-सुविधा पुरविण्याबाबत काम सुरू केले आहे. शुक्रवारी मुंबई येथील टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेसच्या समन्वयक डॉ. वैशाली कोल्हे व कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांची विद्यापीठात बैठक होऊन विद्यापीठ व महाविद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विषयावर सविस्त्रपणे चर्चा झाली. दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे, शैक्षणिक उपक्रम राबविणे या विद्यार्थ्यांसाठी परिषद व कार्यशाळा यांचे आयोजन करणे, छोटे छोटे अभ्यासक्रम तयार करणे आदी बाबत सविस्तर चर्चा झाली.

टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस व विद्यापीठ यांच्यात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी सामंजस्य् करार करण्यात आला या वेळी डॉ.वैशाली कोल्हे, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक बी.पी.पाटील, प्रभारी वित्त् व लेखाअधिकारी सोमनाथ गोहिल, प्रभारी कार्यकारी अभियंता एस.आर.पाटील, विद्यार्थी विकास विभाग संचालक प्रा.सत्य्जित साळवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.पंकजकुमार नन्वरे, विद्यापीठ उप अभियंता आर.आय.पाटील, कनिष्ठ अभियंता विनय देसले, सहायक कुलसचिव रामनाथ उगले, एन.जी.पाटील, श्री. नवजित उपस्थित होते. या करारान्वये विद्यापीठ व परिक्षेत्रात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधांसाठी टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस कडून विद्यापीठाला सहकार्य मिळणार आहे.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शुक्रवार, दि.१२ जलै रोजी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी एक हजार झाडे लावली.

महाराष्ट्र शासनाने जुलै ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात ३३ कोटी वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यानुसार शुक्रवारी विद्यापीठात चार गटांमध्ये विभागणी करून दिक्षांत सभागृह ते मुलींचे वसतिगृह, गांधी टेकडीचा परिसर, ग्रंथालय आदी परिसरात शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृक्ष लावले. कुलगुरु प्रा. पी.पी.पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य् दिलीप पाटील, प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी, प्रा.ए.बी.चौधरी, प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी वित्त् व लेखाधिकारी सोमनाथ गोहिल, प्रा.डी.एस.पाटील, विद्यापीठ उप अभियंता

आर.आय.पाटील, कनिष्ठ अभियंता पी.टी.मराठे आदी उपस्थित होते. यावेळी पळस, निंब, चिंच, गुलमोहर, बेल, रेनस्ट्री, पेल्डफार्म आदी प्रकारचे एक हजार झाडे लावण्यात आली.

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात तंबाखू व्यसनापासून परावृत्त् राहण्यासाठी सामुहिक शपथ घेण्यात आली.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी उपस्थितांना सामुहिक शपथ देऊन विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, प्राचार्य अनिल राव, व्यवस्थापन परिषद सदस्य् दिलीप पाटील, संचालक डॉ. पंकजकुमार नन्वरे, प्रा.ए.एम.महाजनआदी उपस्थित होते.

==============================================

जा.क्र.:- कबचौउमवि/१६/बातमी-हस्तदेय/२०१९ दि.१२ जुलै,२०१९

प्रति,

संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोप्रिय दैनिकातून उपरोक्त् बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी